ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICNECED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख ७ मे, १९५८ | अंक १९

## विविध माहिती

**तांदुळाच्या किंमतींत वाढ नाहीं**—अपुरा पाऊस पडल्यामुळें ब्रह्मदेशांतील तांदुळाच्या पिकांत बरीच घट झाली होती. म्हणून भारताला व सीलोनला निर्यात करावयाच्या तांदुळाची किंमत वाढविण्याचें ब्रह्मदेशाच्या सरकारनें ठरविलें होतें. पण दोन्ही देशांच्या सरकारांनीं ह्या बाबतींत नापसंति दर्शविल्यामुळें आतां तांदुळाच्या किंमतींत वाढ करण्यांत येणार नाहीं.

**आणखी विज्ञान मंदिरें**—भारताच्या सामान्य नागरिकांत शास्त्रीय ज्ञानाविषयीं आस्था व जिज्ञासा उत्पन्न व्हावी म्हणून मध्यवर्ती सरकारच्या शास्त्रीय संशोधन खात्यानें देशांत विज्ञान मंदिरें उघडण्याचें ठरविलें आहे. शास्त्रीय व सांस्कृतिक ज्ञान ग्रामीण जनतेपर्यंत पोंचविण्याच्या दृष्टीनें त्यांची योजना करण्यांत येईल.

**जपानमधील कापडाचा धंदा**—जपानमधील कुटिरोद्योग व कापडाचा धंदा ह्यांचा अभ्यास करण्यासाठी भारताच्या प्रतिनिधींचें एक मंडळ सध्यां जपानला गेलें आहे. मंडळाचा दौरा दोन आठवडे मुदतीचा आहे. अमेरिकेच्या शेतकी खात्यातर्फे ह्या दौऱ्याची योजना पुरस्कृत करण्यांत आली आहे. मंडळांत पांच सभासद आहेत.

**शालेय पुस्तकांचें राष्ट्रीयीकरण**—आंध्र सरकारनें शाळेंतील अभ्यासक्रमाला लागणाऱ्या पुस्तकांचें राष्ट्रीयीकरण केलें होतें. त्याप्रमाणें येत्या जून-जुलैमध्यें शाळांच्या नव्या वर्षास प्रारंभ होईल, त्यावेळीं सरकारनें तयार केलेलें ५ व्या इयत्तेचें तेलगूचें पुस्तक बाजारांत येईल. ह्या पुस्तकाच्या दोन लाख प्रती छापण्याचें काम सध्यां सरकारी छापखान्यांत चालू आहे.

**जपान-पाकिस्तान सांस्कृतिक करार**—जपान व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान गेल्या वर्षीं करण्यांत आलेला सांस्कृतिक करार आतां पक्का करण्यांत आला आहे. करार पांच वर्षे मुदतीचा असून त्याप्रमाणें पुस्तकें, चित्रपट, प्रदर्शनें, इत्यादींची देवाणघेवाण उभयपक्षीं करण्यांत येणार आहे.

**ऑस्ट्रेलिआची पहिली अणुभट्टी**— ऑस्ट्रेलिआंतील पहिली अणुभट्टी सिडने शहरापासून २० मैलांवरील एका गांवीं उभारण्यांत आली आहे ह्या भट्टीच्या उभारणीसाठी सुमारें आठ लाख पौंड खर्च आला. अणुभट्टीला जोडूनच एक संशोधन संस्थाहि स्थापन करण्यांत आली आहे. तीसाठी ४८ लाख पौंड खर्च झाले आहेत.

**पश्चिम जर्मनीची आर्थिक मदत**—आशिआ व आफ्रिका खंडांतील अविकसित देशांना आर्थिक मदत देण्यासाठी पश्चिम जर्मन सरकारनें २ कोटी मार्क्सची रक्कम मंजूर केली आहे. येत्या कांहीं वर्षांत मदतीच्या रकमेची २६ कोटी मार्क्सपर्यंत वाढ करण्यांत येण्याचा संभव आहे. यूरोपच्या आर्थिक भरभराटीसाठी स्थापन करण्यांत आलेल्या फंडांतून ही मदत देण्यांत येणार आहे.

**व्यापारी पळवून पैसा**—धनिक व्यापारी लोकांना पळवून त्यांच्याकडून पैसे उकळणारी एक टोळी सिंगापूरच्या पोलिसांनीं पकडली आहे. गेल्या चार वर्षांत ह्या टोळीनें ह्या मार्गानें सुमारें १,१७,००० पौंड मिळविले असावेत, असा अंदाज पोलिसांनीं केला आहे.

**ठाणे जिल्ह्यांत नवें दीपगृह**—ठाणें जिल्ह्यांत तारापोर ह्या ठिकाणीं एक नवें दीपगृह बांधण्यांत येत आहे. ह्या दीपगृहाचें काम चालू वर्षाअखेर संपेल. दीपगृह बांधण्यासाठी सुमारें ४ लाख रुपये खर्च येईल. त्याची उंची १०० फूट असेल. मच्छीमारी करणाऱ्या बोटी व छोट्या बोटी ह्यांना त्याचा चांगला उपयोग होईल.

**कामगारांसाठी गाळे**—बिहार राज्यसरकारनें जमशेटपूर येथील औद्योगिक कामगारांसाठी १,१०० गाळे बांधण्यास मंजुरी दिली आहे. ह्या कामासाठी अंदाजें ४४·६२ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत निरनिराळ्या औद्योगिक विभागांत असे ६,००० गाळे बांधण्यांत येणार आहेत.

**अग्निबाण सोडण्याचे तळ**—रशिआनें पूर्व जर्मनी, पोलंड व झेकोस्लोव्हाकिआ ह्या देशांतून अग्निबाण सोडण्याचे तळ उभारले आहेत, अशी माहिती नॉर्वेच्या मुख्य प्रधानांनीं सांगितली आहे. ब्रिटिश परराष्ट्रखात्याला ह्यासंबंधीं कांहीं तपशीलवार माहिती नॉर्वेकडून पुरविण्यांत आली आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**पाकिस्तानला रशिआची मदत**—पाकिस्तानचें सरकार रशिआकडून मदत मिळवून एक पोलादाचा कारखाना उभारण्याच्या खटपटींत आहे. अशा प्रकारच्या कारखान्यास जागतिक बँकेकडून आणि अमेरिकेकडून मदत मिळण्याचा फारसा संभव नसल्यानें पाकिस्तान रशिआच्या सहकार्याची खटपट करीत आहे असें म्हणतात.

**सार्वजनिक आरोग्याचें म्युझिअम**—सार्वजनिक आरोग्याच्या निरनिराळया बाजूंकडे लोकांचें लक्ष वेधण्यासाठी नागपूर येथें एक म्युझिअम स्थापन करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. रोगनिवारक व रोगप्रतिबंधक अशा दोन्ही प्रकारच्या साधनांचा उपयोग म्युझिअममध्यें स्पष्ट करण्यांत येणार आहे.

**ब्रह्मदेशाकडून अधिक तांदूळ**—भारत व ब्रह्मदेश ह्या देशांत तांदुळाच्या पुरवठ्यासंबंधीं करार झालेला आहे. ब्रह्मदेशानें ह्या करारांत ठरल्यापेक्षा आणखी २०,००० टन तांदूळ भारताला देण्याचें ठरविलें आहे. उभयता देशांत व्यापाराचा समतोलपणा राखण्याच्या दृष्टीनें अधिक वाटाघाटी होणार आहेत.

**अमरेलीजवळ धरण**—अमरेलीजवळ शत्रुंजीनदीवर एक धरण बांधण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. धरणासाठी १·३० कोटी रुपये खर्च येणार आहे. ह्या भागांत हें दुसरें मोठें धरण होईल. धरण पूर्ण झाल्यावर त्यामधील पाण्यानें १९,००० एकर जमीन भिजेल.


**हिंदी शास्त्रज्ञांचें मॉस्कोला प्रयाण**—भारतामधील १५ प्रमुख शास्त्रज्ञांचें एक मंडळ रशिआच्या दौऱ्यावर गेलें आहे. सोव्हिएट ॲकॅडेमी ऑफ सायन्सेस ह्या संस्थेनें आमंत्रण दिल्यावरुन मंडळ तिकडे जात आहे. आपल्या तीन आठवड्यांच्या दौऱ्यांत मंडळ रशिआंतील शास्त्रीय संशोधन संस्थांना भेट देईल.

**धंदेवाईक गुप्ततेला पाठिंबा**—इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ जर्नलिस्ट ह्या संघटनेची ४ थी जागतिक काँग्रेस लंडन येथें भरली होती. ह्या काँग्रेसमध्यें, पत्रकारांनीं मिळविलेल्या माहितीचा उगम गुप्त ठेवण्याचा त्यांना अधिकार आहे, असा ठराव एकमतानें मंजूर करण्यांत आला.

**आशिआसाठी मार्शल योजना**—१९४७ पासून १९५७ पर्यंत हाँगकाँगचे गव्हर्नर असलेले सर अलेक्झांडर ग्रॅहॅम ह्यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, भारत कम्युनिस्ट झाल्यास सर्व आशिया हातचा गेल्यासारखाच आहे. म्हणून पाश्चात्य राष्ट्रांनीं आशिआंतील राष्ट्रांना आर्थिक मदत देण्यासाठी एखादी मार्शल योजना अमलांत आणली पाहिजे.

**पुराच्या संकटापासून रक्षण**—घाग्रा नदीला येणाऱ्या पुरापासून शेतीचें रक्षण करण्याची तात्पुरती योजना उत्तर प्रदेशाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें आखली आहे. ह्या योजनेसाठी येत्या पावसाळयाच्या आधीं ९ लाख रुपये खर्च करण्यांत येतील. बांधकामामुळें ५०,००० एकर जमिनीचें पाण्यापासून रक्षण होईल.

**महात्मा गांधींची शिकवण**—भारतामधील कॉलेजांच्या अभ्यासक्रमांत महात्मा गांधींच्या शिकवणीचा अभ्यासक्रम ठेवण्याची एक योजना विद्यापीठ अनुदान मंडळानें आखली आहे. जीं विद्यापीठें ही योजना स्वीकारतील, त्यांना मंडळाकडून मदत मिळणार आहे. त्याचप्रमाणें, गांधी स्मारक निधींतूनहि मोठ्या देणग्या देण्यांत येणार आहेत.





कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: —श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



# अर्थ

बुधवार, ता. ७ मे, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## केरळ सरकारचें औद्योगिक धोरण

केरळ राज्य सरकारचे अर्थमंत्री श्री. सी. अच्युत मेनन ह्यांनीं सरकारच्या औद्योगिक धोरणाविषयीं त्रिचूर येथें एका जाहीर सभेंत बोलतांना विस्तृत खुलासा केला आहे. एंजिनिअरिंग कामगार युनिअनतर्फे भरविण्यांत आलेल्या एका सभेंत ते बोलत होते. श्री. अच्युत मेनन आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भांडवलदारांच्या मनांत चिंता उत्पन्न करण्याचें सरकारचें धोरण नाहीं. उलट, कामगार आणि कारखानदार ह्यांच्यांत सलोख्याचें वातावरण निर्माण करण्याचा सरकारचा हेतु आहे. राज्यांतील कामगारांच्या वागणुकीमुळें राज्याबाहेरील भांडवल राज्यांत येणार नाहीं अशा प्रकारचा प्रचार करण्यांत येत आहे. कामगारांच्या हितांचें रक्षण करण्याचे प्रयत्न सरकार करील हें तर खरेंच. पण त्याचबरोबर कारखानदारांच्या वाजवी हितसंबंधाकडेहि सरकार लक्ष पुरवील. केरळ राज्यांतील परिस्थिति कांहीं विशिष्ट प्रकारची आहे. त्यामुळें आर्थिक प्रगति घडवून आणण्यासाठीं द्रुत गतीनें औद्योगीकरण घडवून आणण्याखेरीज दुसरा मार्गच राहिलेला नाहीं. सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांशिवाय खाजगी मालकीच्या विभागांतहि निरनिराळ्या प्रकारचे उद्योगधंदे निघावेत, अशी सरकारची इच्छा आहे. म्हणून राज्यांत नवे उद्योगधंदे काढण्यासाठीं कारखानदारांना जास्तींत जास्त सवलती देण्याची सरकारची तयारी आहे. राज्यांतील उद्योगधंद्यांत शांतता राखण्यासंबंधीं कारखानदार व कामगार ह्यांच्यांत दीर्घ मुदतीचे करार करण्यांत आले, तर सरकार त्यांचें स्वागत करील.

उभय पक्षांत वाटाघाटी करण्यांत येऊन असे करार करण्यांत आले तर केवळ त्यांचेंच हित होणार आहे, असें नाहीं. अशा करारामुळें राज्यांतील उद्योगधंद्यांचा विस्तार, त्यांची प्रगति आणि भरभराट ह्या गोष्टीहि साध्य होण्याच्या मार्गास लागतील. भारतांत राष्ट्रीय पुनर्घटनेचें महत्त्वाचें काम चालू करण्यांत आलें आहे. ह्या कामांत कामगारांवर मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. सर्व देशांत अनेक प्रकारच्या उद्योगधंद्यांची वाढ होऊन प्रगति व्हावयाची असेल तर दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी करणें अतिशय अगत्याचें आहे. त्याचप्रमाणें पुढील पंचवार्षिक योजनाहि चांगल्या रीतीनें पार पाडण्यांत आल्या पाहिजेत. हें यश गाठण्याच्या कामीं कामगारांनीं आपला वांटा परिणामकारक रीतीनें उचलला पाहिजे. आपले हेतू साध्य करून घेण्यासाठीं कामगारांना आपली संघटना करण्याचा हक्क असला पाहिजे ही गोष्ट आतां सर्वमान्य झालेली आहे. पण, आपले हेतू साध्य झाले म्हणजे झाले; त्यानंतर कामगार संघटनांचें कार्य शिल्लक राहत नाहीं असें, कामगारांनीं मानता कामा नये. कामगार संघटना आणि कामकरी जनता ह्यांना ह्यापेक्षा अधिक महत्त्वाचें कार्य करावयाचें आहे. ज्या उद्योगधंद्यांत आपण काम करतों त्या उद्योगधंद्यांची सर्व बाजूनें प्रगति घडवून आणण्यासाठीं सहकार्य करण्यावर त्यांनीं आपलें लक्ष केंद्रित केलें पाहिजे. असें सहकार्य झालें तरच उद्योगधंद्यांच्या विस्ताराबरोबरच त्यांची स्वतःचीहि भरभराट होऊं शकेल.

---

## चीनमधील व भारतांतील समाजवादाची वाटचाल

लोकसंख्येच्या व विस्ताराच्या दृष्टीनें भारत व चीन हे आशिआ खंडांतील दोन मोठे देश आहेत. दोन्ही देशांतील सरकारांनीं आपआपल्या देशांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत. म्हणून पुष्कळदां दोन्ही देशांत करण्यांत येत असलेल्या प्रगतीची तुलना करण्यांत येत असते. भारताचे चीनमधील माजी वकील श्री. आर. के. नेहरू ह्यांनीं अशी तुलना न करतां उभयतां देशांतील परिस्थितीचें विवरण केलें आहे. ह्या विषयासंबंधीं मुंबई येथें बोलतांना ते म्हणाले कीं, चीनमध्यें समाजवाद हा शांततेच्या व संथ पद्धतीनें अमलांत आणण्यांत येत आहे. चीनच्या सरकारचें धोरण समाजवादी समाजरचना प्रत्यक्षांत आणण्याचें आहे. भारतानें ह्या बाबतींत अधिक लवचिक दृष्टिकोन स्वीकारला आहे. भारतांत समाजवादी ढंगाची समाजरचना स्थापन करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. ह्या पद्धतींत खाजगी व सार्वजनिक मालकीच्या अशा दोन्ही विभागांना स्थान आहे. अर्थातच चीनमधील समाजवाद व भारतामधील समाजवाद ह्यांच्यांत मूलतःच फरक आहे. चीनमधील घडामोडींचें मूल्यमापन करतांना सहानुभूतिपूर्वक विचार करण्यांत आला पाहिजे. असें करतांना चीनचा इतिहास व त्या देशापुढे असलेले विशेष प्रकारचे प्रश्न ह्यांचा खास अभ्यास करण्यांत आला पाहिजे. तथापि, उभयतां देशांत करण्यांत येत असलेल्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नांची व त्यांच्या फलनिष्पत्तीची तुलना करण्याचें कारण नाहीं. दोन्ही देश आपआपल्या पद्धतीनें प्रगति करीत आहेत, ह्यांत शंका नाहीं.

---

## पश्चिम जर्मनीकडून भारताला मिळणारी मदत

पश्चिम जर्मन सरकारनें आशिआंतील अविकसित देशांना आर्थिक मदत देण्यासाठी एका फंडाची उभारणी केली आहे. ह्या फंडामधून सुमारें ४ कोटी मार्क्स अथवा ४·५ कोटी रुपये इतकी मदत मिळण्याची शक्यता आहे. ही मदत मुख्यतः तांत्रिक स्वरूपाची असेल. वरील मदतीशिवाय आणखी १० कोटी मार्क्सची रक्कम पश्चिम जर्मनीनें भारतासाठी राखून ठेवलेली आहे. परंतु, तिचा विनियोग कशा प्रकारें करण्यांत येणार तें अद्याप तपशीलवाररीत्या ठरविण्यांत आलेलें नाहीं. मदतीच्या पहिल्या कार्यक्रमानुसार ओखला इंडस्ट्रिअल इन्स्टिट्यूट ही संस्था उभारण्याच्या कामीं पश्चिम जर्मनीचें सरकार सहकार्य करणार आहे. ह्या संस्थेंत उत्पादनाचें आधुनिक तंत्र शिकविण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. संस्थेसाठी लागणारी यंत्रसामुग्री व इतर साधनें आणि तज्ज्ञांची मदत ह्या सर्व

गोष्टी पुरविण्याची जबाबदारी पश्चिम जर्मन सरकार घेणार आहे. संस्थेसाठी सुमारें ४.४ लाख रुपये किंमतीची यंत्रसामुग्री लागेल त्याचप्रमाणें, मद्रास राज्यांत गिंडी ह्या ठिकाणीं उच्च तांत्रिक शिक्षणाची जी संस्था स्थापन करण्यांत येणार आहे तिलाहि जर्मन सरकारकडून १.७ कोटी रुपयांची मदत करण्यांत येणार आहे. खरगपूर येथें अशा प्रकारची एक संस्था ह्यापूर्वी स्थापन करण्यांत आली आहे. खरगपूर येथील संस्थेंत डॉ. क्रौस हे जर्मन तज्ज्ञ गेलीं सहा वर्षे काम करीत आहेत. गिंडी येथील संस्थेची रूपरेषा आखण्यासाठी ते ह्यर्या पश्चिम जर्मनींत गेले आहेत. ते परत आल्यावर राज्य सरकार व मध्यवर्ती सरकार ह्यांच्या सल्ल्यानें तपशील ठरविण्यांत येईल.

---

# मुंबई राज्य सहकारी कारखाना संघ

## व्याप्ति आणि दिशा

ले.—डॉ. र. गो. काकडे, एम्. ए., एल्एल्. बी., पीएच्. डी.

**सहकारी साखर कारखान्यांचें कार्य सुव्यवस्थित चालावें, समान अडचणींचा परिहार करतां यावा, यासाठीं स्थापन झालेल्या या संघाचे कार्याचा परिचय.**

सहकारी साखरकारखाना संघ ही संस्था मुंबईच्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झाली असून तिचे कार्यास दोन वर्षापूर्वी सुरुवात झाली. सबंध मुंबई राज्य हें संस्थेचें कार्यक्षेत्र होय. संघाचें सभासदत्व सहकारी साखरकारखान्यापुरतें मर्यादित असल्यामुळें, गुजराथमधील तीन व महाराष्ट्रांतील १५ असे संघाचे एकूण १८ सभासद आहेत. प्रत्येक सभासद कारखान्यास संघाचे जनरल बॉडीवर तीन व कार्यकारिणीवर त्यांचेपैकी एक असे सभासद पाठविण्याचा अधिकार आहे. कारखान्यांच्या प्रतिनिधींची निवड ज्या त्या कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेंत त्या कारखान्याच्या सभासदांकडून करण्यांत येत असते. कारखान्यांच्या प्रतिनिधींशिवाय, मुंबई सरकारचे प्रतिनिधि, सहकारी खात्याचे रजिस्ट्रारसाहेब, मुंबई राज्य सहकारी बँकेचे प्रतिनिधि, औद्योगिक खात्याचे डायरेक्टर, कारखान्यांना कर्ज देणाऱ्या दिल्लीच्या इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनचे प्रतिनिधि, स्वीकृत केलेले दोन तज्ज्ञ व संघाचे मॅनेजिंग डायरेक्टर (पदसिद्ध) असे इतर सभासद संघांत आहेत. अशा तऱ्हेनें संघाच्या दृष्टीनें ज्या ज्या संस्थेशीं अगर खात्याशीं संबंध येतो अशांच्या प्रतिनिधींना संघांत स्थान दिलें गेलें आहे. संघाच्या कार्यकारिणीची सभा दर महिन्यांत होत असते.

इतर कारखानदार किंवा व्यापारी यांच्या संस्थांच्या उद्दिष्टांप्रमाणेंच संघाचें उद्दिष्ट आहे. आपल्या हितसंबंधाची जपणूक करणें, समान अडचणींतून मार्ग काढण्यासाठी सर्वांनीं एकत्र येऊन त्यांचा विचार करणें, सरकार व इतर संबंधी संस्थांकडे प्रतिनिधित्व करणें, महत्त्वाच्या प्रश्नांवर सभासदांना सल्लामसलत, मार्गदर्शन, वगैरेंद्वारां जरूर ती मदत करणें, हीं संघाचीं उद्दिष्टें आहेत. ह्याहिपुढें जाऊन आपल्या सभासद-कारखान्यांना नोकर-नेमणूक, मालाची खरेदी-विक्री, हिशेबतपासणी, वगैरे दैनंदिन महत्त्वाच्या प्रश्नांबाबत शक्य व आवश्यक असेल ती मदत करण्याचें उद्दिष्ट संघानें आपल्यापुढें ठेविलें आहे. कोणत्याहि सभासद-कारखान्याच्या अंतर्गत व्यवहारांत हात न घालतां बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या हक्काला, अधिकाराला, जबाबदारीला अगर प्रतिष्ठेला बाध न आणतां सर्व सहकारी साखरकारखान्यांच्या धोरणांत नि कार्यपद्धतींत जास्तींत जास्त एकसूत्रीपणा व सुसंगतपणा आणण्याचा संघाचा प्रयत्न आहे. जे खरेदी-विक्रीचे व्यवहार सांघिक रीतीनें हितावह ठरतील ते हातीं घेण्यांत येतात व तेहि सभासद-कारखान्यांच्या इच्छेनुसार. तसेंच, संघानें अंगावर घेतलेलीं निरनिराळ्या प्रकारचीं कामें खास नेमलेल्या उपसमित्यांकडून केलीं जातात. अशा ह्या उपसमित्यांवर मुख्यतः कारखान्यांचे प्रतिनिधि असतात.

सहकारी साखरकारखाने सुरू होईपर्यंत निरनिराळ्या अवस्थेंतून जात असतांना त्यांना वेळोवेळीं अनेक प्रश्नांवर तंत्रज्ञ व संबंधी सरकारी अधिकारी यांचा सल्ला व मार्गदर्शन लागतें. तें मिळवून देण्यासाठी मुंबई राज्य सहकारी बँकेनें पुढाकार घेऊन प्रो. ध. रा. गाडगीळ यांचेच अध्यक्षतेखालीं १९५४ चे मध्यास एक मध्यवर्ति समिति नेमली होती. ह्या मध्यवर्ति समितीकडून अनेक कारखान्यांना अगदीं सुरुवातीपासून बहुमोल मार्गदर्शन व प्रत्यक्ष मदत मिळाली ह्या अनुभवावरून, सर्व सहकारी साखरकारखान्यांचीच अशी एखादी बिनसरकारी पण सरकारमान्य यंत्रणा निर्माण करण्यांत यावी अशी कल्पना निघाली व तीस सहकारी साखरकारखान्यांतील प्रमुख डायरेक्टर्स व मुंबई सरकार अशा दोन्ही हितसंबंधांचा पाठिंबा मिळाला. प्रस्तुतचा संघ हें या कल्पनेचें मूर्त स्वरूप होय. संघाचे पोटनियम सर्व सहकारी साखरकारखान्यांच्या प्रतिनिधींच्या २-३ सभेंत चर्चिले गेल्यानंतरच कायम करण्यांत आले. संघाचे अध्यक्ष म्हणून प्रो. गाडगीळ यांची सुरुवातीपासून निवड करण्यांत आली असून कच्छचे कमिशनर म्हणून रिटायर झालेले व सर्वांच्या परिचयाचे असे श्री. संभाजीराव घाटगे हे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम करीत आहेत.

सहकारी साखरकारखान्यांच्या पोटनियमानें प्रत्येक कारखान्यानें संघाचा सभासद व्हावयास पाहिजे अशी सक्ति असली तरी कांहीं विशिष्ट परिस्थितींत व विशिष्ट कारणासाठी सभासद-कारखान्याला मे. रजिस्ट्रारसाहेबांच्या आगाऊ संमतीनें संघांतून बाहेर पडण्याची मुभा ठेवण्यांत आली आहे. कारखाना जोंपर्यंत संघाचा सभासद आहे तोंपर्यंत संघाच्या नियमाप्रमाणें दर किंवा ऊंस-गळीतावर बसविलेली संघाची वार्षिक वर्गणी त्याला द्यावी लागते. कारखान्यांकडून अशा रीतीनें येणारी वर्गणी ही संघाच्या उत्पन्नाची एक महत्त्वाची बाब आहे व त्यांतून संघाचा दैनंदिन खर्च भागविण्यांत येतो.

सहकारी साखरकारखान्यांची घडण विचारांत घेतां, सर्व सहकारी साखरकारखान्यांतील व्यक्तींनीं एकत्र येऊन समान अगर सामायिक प्रश्नांचा सामुहिक विचार करण्याची आणि सर्वांच्या व्यवहारांत सुसंबद्धपणा व एकसूत्रीपणा निर्माण करण्याची गरज कोणीहि नाकारूं शकणार नाहीं. निरनिराळ्या प्रकारच्या व्यवहाराची माहिती व प्रत्यक्ष अनुभव जसजसा वाढत जाईल तसतशी संघाच्या कार्याची दिशा, व्याप्ति व मार्गदर्शन वाढत जाईल. तसेंच संघाच्या कामाची उपयुक्तता सभासद-कारखान्यांना जसजशी अधिक प्रमाणांत पटत जाईल, तसतसें त्याच्या कार्याचें क्षेत्र उत्तरोत्तर विस्तृत झाल्याशिवाय राहणार नाहीं.

—'शेतकी आणि शेतकरी'

# नवीन कंपनी कायद्याची दुरुस्ती

( लेखकः—श्री. नारायण विनायक भोंडे, बी. ए., एलएल. बी., पुणें )

( ३ )

## सभा—नोटिसा व गणसंख्या—मताधिकार

( ७ ) सभांच्या नोटिसा व गणसंख्या हा एक वादाचा विषय आहे. विद्यमान कायद्यानें सर्वसाधारण सभेस २१, पण विशेष ठरावास २८ दिवस आवश्यक अशी तरतूद आहे. नवीन दुरुस्तीनें सर्वसाधारण सभेस २८ व विशेष नोटिशीस २१ दिवसांची असा फरक सुचविला आहे. म्हणजे सर्वसाधारण सभेची नोटीस सुटल्यानंतर विशेष विषय सुचविण्याचा हक्क सदस्यांस दिला व तो त्यांनीं बजावला तर त्या नवीन विषयाची समज संबंधी सदस्यांस केव्हां व कशी पोहोंचणार ? का त्याकरितां पुन्हां वेगळी समज, निराळी छपाई, व स्वतंत्र टपाल ? ह्या दुरुस्तीनें निष्कारण घोटाळे मात्र वाढणार. तसेंच सांप्रत कलम १७४ अन्वयें सार्वजनिक व कितीहि सभासद असलेल्या कंपन्यांच्या साधारण सभेस केवळ पांच जणांची उपस्थितीहि पुरेशी ठरविली आहे. हजार-बाराशे भागीदार असलेल्या कंपन्यांत १२-१५ संचालक असतात. पण साधारण सभेंत पांच जणांनीं जमून कामकाज उरकून घेणेस कायद्यानें मान्यता देणें, म्हणजे गण-संख्येच्या तत्त्वाची थट्टाच होय. निदान, संचालकांचे संख्येपेक्षा जास्त सदस्य जमल्याशिवाय सभेचें काम चालूं नये असा दंडक कायद्यानेंच असावयास पाहिजे. इंग्लिश कायद्याचें कलम १३४ ( क ) अन्वयें तीन सभासदांनीं गणपूर्ति होते पण उद्योन्मुख लोकशाहीनें सहकारप्रिय भारतानें पाश्चात्यांचें याबाबतींत तरी अंध अनुकरण करूं नये. कोणी म्हणतात कीं, कंपनीनें आपल्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमध्यें जास्त संख्या गणपूर्तीसाठी वाटल्यास आवश्यक ठरवावी. पण कायद्यानें एवढें स्वातंत्र्य दिल्यावर कोण संचालक मंडळ आपल्यावर जास्त उपस्थितीचें बंधन घालून घेईल ?

विद्यमान कायद्यानें कोणाहि बिगर सदस्यांस सर्वसाधारण सभेचे वेळीं मत देण्यासाठी मुनीम नेमता येतो. पण त्याला बोलण्याचा अधिकार नाहीं. ही अर्धवट स्थिति उपयोगी नाहीं. मत देणारास आपले विचार मांडण्याची व आपला दृष्टिकोन पटवून देण्याची मुभा असली पाहिजे. जर बिगर सदस्य मुनीमांस तसे करण्याची परवानगी द्यावयाची नाहीं तर त्यांस मताचा अधिकारच देऊं नये व मुनीम होण्यास तो अपात्र ठरवावा.

## राजकीय पक्षास मदत—'कंपनींत' राजकारण

( ८ ) संचालकांचे अधिकारावरील नियंत्रणें कलम २९३ मध्यें नमूद केलीं असून त्यांपैकी पोट कलम १ ( ई ) अन्वयें सर्वसाधारण सभेच्या संमतीशिवाय कंपनीचे कामकाजाशीं अगर नोकरवर्गाचे हिताशीं संबंध नसलेल्या बाबीसाठी २५ हजार रु. अगर एका वर्षाच्या निव्वळ उत्पन्नापैकी ५ टक्केपर्यंत रक्कम देणगी देण्याची मुभा संचालकास आहे. ह्या तरतुदीचा फायदा घेऊन कांहीं कंपन्यांनीं राजकीय पक्षाचे फंडास मदत देण्या-बाबत मेमोरँडममध्यें दुरुस्ती करण्यासाठी मुंबई व कलकत्ता येथील हायकोर्टांकडे परवानग्या मागितल्या. व नामदार हाय-कोर्टांनीं नाखुषीनें या फरकास मान्यता दिली. पण तसें करतांना राजकीय पक्षांस प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष दिलेल्या मदतीची माहिती कंपनीनें आपल्या नफातोटा-पत्रकांत द्यावी अशी अट घातली आहे. व एका अर्जात ही सवलत सहा वर्षे व दुसऱ्या अर्जात सदर देणगीचा तपशील दोन वृत्तपत्रांत सविस्तर देण्याचा आदेश हायकोर्टानें दिला आहे. तथापि ह्या वृत्तपत्रां-तील प्रसिद्धीचा खरोखर उपयोग नाहीं. कारण ह्या प्रसिद्धी-करणानंतर नाराज सभासदांस ही देणगी थोडीच परत बोलावतां येते ? पैसा गेला तो काय परत येण्यास गेला ?

कधीं कॉंग्रेस तर कधीं प्रजा सोशॅलिस्ट, तर कधीं जनसंघ तर कधीं कम्युनिस्ट, असे पक्ष सत्ताधिकारी असतील व कंपन्यांचे कारभारांत व नियंत्रणांत राजकारण लढाविणें हें केव्हांहि उचित नाहीं. पण मजूर संघासहि राजकीय हेतूसाठी राजरोस फंड उभारतां येतो. ( ट्रेड युनिअन्स अॅक्ट क. १६ पहा) मुंबई व कलकत्ता ह्या दोन्हीं कोर्टांला कंपन्यांत राजकारण-प्रवेश संमत नाहीं. पण कायद्यांतील सवलतीमुळें त्यांचें कांहीं चालेना. शेवटीं समितीनें अशी शिफारस केली आहे कीं, अशी देणगी दिल्यावर, प्रत्येक कंपनीनें आपले वार्षिक अहवालांत राजकीय पक्ष, देणगीची रक्कम, देणगी घेणाराचें नांव, वगैरे तपशील आपले वार्षिक अहवालांत स्पष्ट द्यावा. हेतु असा कीं, सभेचे वेळीं सदस्यांस आपलें म्हणणें सर्वांस कळवून आगामी धोरणावर मार्गदर्शन करतां यावें.

याखेरीज या समितीनें आणखी कांहीं तपशील दिला व दुरुस्त्या सुचविल्या आहेत. परंतु मध्यवर्ती मंत्रिमंडळ त्यांपैकी कोणत्या दुरुस्त्या नवीन विधेयकांत समाविष्ट करतें, हें समजल्यावर त्याचें परिशीलन करतां येईल. ( समाप्त )

---

**टोळधाड येण्याचा धोका**—पश्चिम आशिआंत आफ्रिका ते पाकिस्तानपर्यंत फार मोठी टोळधाड आलेली आहे. गेल्या पांच वर्षांत एवढी मोठी टोळधाड आलेली नव्हती. उत्तर इराण-मध्यें ५० मैल लांबीचा एक टोळांचा थवा आढळून आला आहे. ही लाट इराण व भारतापर्यंत येण्याचा धोका आहे.

**१०१ वर्षांच्या स्त्रीवर शस्त्रक्रिया**—ब्रिटनमधील एक हिंदी शस्त्रक्रिया-तज्ज्ञ डॉ. परमानंद शर्मा ह्यांनीं १०१ वर्षे पूर्ण झालेल्या एका स्त्रीवर मोडलेल्या हाडासाठी यशस्वी शस्त्रक्रिया केली. ब्रिटनमधील सहा इस्पितळांना ही शस्त्रक्रिया करण्यास नकार देण्यांत आला होता. डॉ. परमानंद २९ वर्षांचे आहेत.

**विकास कामांचा अभ्यास-दौरा**—भारतामधील विकास कामांचा अभ्यास करण्यासाठीं दिल्ली येथून ४०० मुलामुलींचा एक गट दौऱ्यावर निघणार आहे. गटांत निरनिराळ्या भागांतील विद्यार्थी असून ते एक महिनाभर फिरणार आहेत. दौरा संपल्यावर सर्व विद्यार्थी काश्मीरलाहि जाणार आहेत.

**ताजमहालाजवळील बागा**—लोकसभेच्या एस्टिमेट्स कमिटीनें ताजमहालला भेट दिली असतां, त्याच्या भोंवतालच्या बागा कमिटीच्या सभासदांना दुर्लक्षित स्थितींत आढळून आल्या. भारत सरकारच्या पुराणवस्तु संशोधन खात्यानें ह्या इतिहास-प्रसिद्ध बागांची निगा राखण्याकडे अधिक लक्ष पुरवावें, अशी सूचना कमिटीनें केली आहे.

**आफ्रिकेला मदत करा**—सहारा वाळवंटाच्या दक्षिणेस असलेल्या व दक्षिण आफ्रिकेच्या उत्तरेस असलेल्या आफ्रिकेच्या आर्थिक व राजकीय वाढीसाठी अमेरिकन सरकारनें व उद्योग-पतींनीं मदत करावी, अशी सूचना अमेरिकन नॅशनल प्लॅनिंग असोसिएशननें केली आहे. सध्या दरसाल २·२ कोटी डॉलर्सची मदत देण्यांत येते.

## डनलॉप रबर कंपनी ( इंडिया ) लि.

### ( गेलीं वीस वर्षे )

भारतांतील रबर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीजमध्यें सर्वश्रेष्ठ ठरलेल्या या संस्थेची स्थापना वीस वर्षांपूर्वी झालेली असून उत्तरोत्तर तिची प्रगतीच आजपावेतों होत गेली याचें कारण व्यवस्थापक आणि कामगार यांचें सश्रम सहकार्य हेंच होय. आज या कंपनीच्या नोकरवर्गांत सुमारें ४,८०० लोक खपत असून कंपनीचा दैनंदिन व्यवहारोपयोगी माल वापरणाऱ्या आपल्या देशांतील लोकांची संख्या १,००,००,००० पेक्षां अधिक भरते.

१९३६ च्या सुमारास या कंपनीचा प. बंगालमध्यें सहागंज येथें पहिला कारखाना स्थापन झाला. देशांतील अनेक प्रकारच्या वाहनांसाठी लागणारा हरतऱ्हेचा रबरी माल मोठ्या प्रमाणांत पुरविण्याबाबत आज या कारखान्याला कमालीचें महत्त्व प्राप्त झालें आहे. सर्व आशिया खंडांत याच्या तोडीचा दुसरा कारखाना सध्यांतरी नाहीं. डनलॉप्सच्या कार्यक्रमांतील प्रमुख हेतु देशाला अनेक सुधारणा घडवून आणण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेली परदेशी हुंडणावळी वाचविणें हाच आहे. १९३५-३६ मध्यें हिंदुस्थानांत २,००,००,००० रु. किंमतीचा रबरी माल आयात् झाला होता. डनलॉप्सच्या अभावीं, सध्यां ज्या मानानें उद्योगधंद्यांची सुधारणा घडते त्या मानानें, १,००,००,००,००० रु. पेक्षा अधिक रक्कम त्यासाठी खर्च आला असता.

१९३६ मध्यें कारखाना (डनलॉप्स सहागंज फॅक्टरी) चालू झाल्यापासून तें १९५७ (नोव्हेंबर) अखेरपर्यंत सुमारें ७,००,००,००० टायर्स, शिवाय हरतऱ्हेचा आणखी कांहीं रबरी माल त्या ठिकाणीं बनविण्यांत आलेला असून, सध्यां भारतभर ठिकठिकाणीं ज्या 'रिव्हर व्हॅली प्रॉजेक्टस' मध्यें अत्यंत महत्त्वाच्या साधनसामुग्रीचा वापर करण्यांत येतो त्या 'जाइंट अर्थमूव्हिंग इक्विपमेन्ट' करितां लागणारे टायर्स् बनविण्याची योजना, कंपनीनें प्रचंड भांडवल गुंतवून हातीं घेतली आहे. देशाच्या उन्नतीसाठी देशाच्या गरजा ओळखून नेमकें साहाय्यभूत कसें होतां येईल या दृष्टीनें डनलॉप्स आपल्या कार्यक्रमाची दिशा ठरवून आपला कार्यक्रम सतत पार पाडीत असते.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस आपल्या देशांतील मोटरट्रक्सचा आकडा १,६०,००० होईल आणि १९६१ च्या सुमारास मोटारगाड्यांना लागणाऱ्या टायर्सची संख्या १,६५,००० च्या घरांत जाईल, तसेंच, सायकलींसाठी निदान १,१०,००,००० टायर्सची (वार्षिक) निर्मिति करणें अगत्याचें होईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. त्याशिवाय गरज भागणार नाहीं. त्याचबरोबर, उद्योगधंद्यांची झपाट्यानें होणारी वाटचाल आणि लक्षावधि लोकांचें जीवनमान तोंपर्यंत उंचावण्याची शक्यता इतर अनेक प्रकारच्या रबरी मालाच्या मागणीलाहि कारणीभूत होईल यांत शंका नाहीं.

१९६१ मधील या गरजा भागविण्यासाठीं डनलॉप्स अर्थात् जागरूक असल्यामुळें मद्रासजवळ अंबत्तूर या ठिकाणीं सहागंज-प्रमाणेंच दुसऱ्या एका कारखान्याची स्थापना चालू आहे. १९५८ च्या अखेरीस या कारखान्यांत मालाची निर्मिति होऊं लागेल, अशी अपेक्षा आहे.

या २१ वर्षांच्या इतिहासांत डनलॉप्सनें कदापि श्रम अथवा पैसा यांत काटकसर न करतां कामगारांना सुखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. डनलॉप कं. च्या या छोट्याशा संस्थानानें सुमारें १९९ एकर जागा व्यापलेली असून त्या ठिकाणीं कामगारांसाठी सर्वप्रकारच्या सोयी, निवासस्थानें, रुग्णालयें, दवाखाने, क्रीडा-करमणूक केंद्रें, विद्यालयें, दुकानें इ. जय्यत तयार आहेत आणि एकूण व्यवस्था अतिशय समाधानकारक आहे, असेंच मत तेथील कामगार व्यक्त करतात.

---

### अन्नधान्याच्या तारणावरील शेड्यूल्ड बँकांचीं कर्जे

एप्रिल, १९५८ अखेर शेड्यूल्ड बँकांचीं अन्नधान्यांच्या तारणावरील कर्जे १४·०८ कोटी रुपयांचीं होतीं. मे, १९५७ अखेरची तत्सम रक्कम ४३·११ कोटी रु. होती. १ जानेवारी, १९५८ नंतर उघडण्यांत आलेल्या प्रत्येक नव्या कचेरीच्या १ लक्ष रुपयांच्या अशा कर्जाची रक्कम परवानगीच्या रकमेंत हिशेबांत घेऊं नये, असें ठरविण्यांत आलें आहे. ही नवी कचेरी पूर्वी जेथें दुसऱ्या शेड्यूल्ड बँकांची कचेरी नव्हती अशा ठिकाणीं इतर कचेऱ्यांपासून २० मैल दूर उघडण्यांत आलेली असली पाहिजे. ग्रामीण भागांत नव्या शाखा उघडण्यास ह्यामुळें सोपें जाईल.

---

### दिल्ली येथील टेलिव्हिजन

मार्च १९५९ च्या पूर्वी दिल्ली येथें एक प्रायोगिक टेलिव्हिजन युनिट सुरू करतां येईल, अशी आशा आकाशवाणी मंत्री श्री. केसकर ह्यांनीं पार्लमेंटांत व्यक्त केली. परदेशी हुंडणावळीच्या अडचणीमुळें विलंब लागत आहे. २ लक्ष रुपयांच्या हुंडणावळीचा हा प्रश्न आहे. युनिटचे कांहीं भाग परदेशांतून यावयाचे आहेत, त्यासाठी कर्ज मिळविण्याच्या खटपटींत सरकार आहे.

---

**पोलाद कारखान्यांतील तंत्रज्ञ नोकर—** भारतामधील रूरकेला, भिलई आणि दुर्गापूर ह्या ठिकाणीं असलेल्या पोलादाच्या कारखान्यांतून सुमारें १,८०० तंत्रज्ञ काम करीत आहेत. त्यांपैकी भिलई येथील कारखान्यांत सर्वांत, जास्त म्हणजे ९५९ तंत्रज्ञकामावर आहेत. दुर्गापूर कारखान्यांत ३६० व रूरकेला कारखान्यांत ४९२ तंत्रज्ञ काम करीत आहेत.

**नव्या रेल्वे मार्गांना मंजुरी—** दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत समाविष्ट करण्यांत आलेल्या रेल्वेच्या बहुतेक नव्या मार्गांना रेल्वे बोर्डानें मान्यता दिली आहे. मंजुरी मिळालेले रेल्वेमार्ग पूर्ण करण्यास १,०२४ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. भारतामधील रेल्वेना दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १,१२५ कोटी रुपये मिळणार आहेत.

**तगाई कर्जाची वाटणी—** गेल्या वर्षी अहमदाबाद जिल्ह्यांत तगाई कर्ज म्हणून ५ लाख रुपये मुंबई सरकारनें वाटलें. ह्या कर्जाचा उपयोग शेतकऱ्यांनीं जुन्या विहिरींची दुरुस्ती करणें व नव्या विहिरी खोदणें ह्या कामांसाठी केला. सुमारें १,००० नव्या विहिरी खोदण्यांत आल्या.


★ होतकरू संसारी तरुण-तरुणींसाठी ★

श्री. वा. काळे ह्यांचें मार्गदर्शक हितगुज

| | |
|---|---|
| कण आणि क्षण | रु. २=५० |
| पुढें पाऊल | रु. २=०० |
| तुमचें स्थान कोणतें? | रु. २=०० |

ह्या यशस्वी पुस्तकांची भेट देऊन तुमचें शुभचिंतन प्रभावी करा!

—अभिनव पुस्तकमंदिर, पुणें ४.—

## विदर्भ सहकारी परिषदेनें मंजूर केलेले ठराव

### सामिलीकरणास विरोध

शेतीच्या उत्पादनांत जास्तींत जास्त वाढ करण्यासाठीं शेतकऱ्यांना पुरेसा व वक्तशीर पैसा अर्थात् कर्जाचा पुरवठा करण्याच्या दृष्टीनें तहसील बँका योग्य घटक आहेत आणि सरकारच्या योग्य मदतीनें त्या सर्वतोपरीं कार्यक्षम होतील, असा विदर्भांतील सहकारी कार्यकर्त्यांचा विश्वास आहे. तसेंच, प्रचलित शासनाच्या विकेंद्रीकरणावरच विशेष भर असतांना तहसील बँकांचें केंद्रीकरण करणें अनिष्ट व प्रतिगामी स्वरूपाचें होईल असें या परिषदेचें स्पष्ट मत आहे. सबब तहसील बँकांचें जिल्हा बँकेंत सामिलीकरण करण्याचा विचार सोडून द्यावा, अशी सरकारला विनंति आहे.

### प्राथमिक लँडमॉर्गेज बँकांचा व्याजाचा दर

सध्यां विदर्भांतील प्राथमिक लँड मार्गेज बँका विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँकेला संलग्न असून त्यांना द. सा. द. शें ५ (पांच) प्रमाणें कर्ज मिळतें. तसेंच कर्जाचे १ प्रतिशत प्रमाणेंच विदर्भ बँकेचे शेअर्स घ्यावे लागतात. तरी विदर्भ बँकेचा लँड मॉर्गेज विभाग, मुंबई प्रॉव्हिन्शियल लँड मार्गेज बँकेंत संमीलित झाल्यास व्याजाचा दर व हिस्से खरेदीचें प्रमाण कोणत्याहि प्रकारें वाढूं नये. तसेंच बोर्डावर योग्य प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळावें, असें या सभेचें स्पष्ट मत आहे. सबब मुंबई बँकेनें दि. १०–१–१९५८ ला केलेल्या ठरावांत आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात.

### प्राथमिक लँड मार्गेज बँकांचें काम सुकर कसें होईल ?

प्राथमिक लँड मॉर्गेज बँकाचें काम सुकर, सुलभ व लोकप्रिय करणाच्या दृष्टीनें ही परिषद् सरकारला खालील शिफारस करते. १. कर्जमागणीच्या अर्जाचे निकाल शक्यतों लवकर लावण्याच्या दृष्टीनें अर्ज–तपासणीच्या कार्यपद्धतींत योग्य तो बदल करून प्रत्येक अर्जाचा निकाल जास्तींत जास्त चार महिन्यांत व्हावा. २. सध्यांच्या जमिनीच्या किंमतीच्या मानानें लँड मॉर्गेज बँकांना घालून दिलेल्या मल्टीपल्स् अत्यंत कमी आहे. त्यामुळें योग्य किंमतीचें तारण देऊनाहि पुरेसें कर्ज देतां येत नाहीं. तरी सध्यांचे मल्टीपल्स् चालूं किंमतीवर ठरविण्यांत यावें. ३. कर्जमागणीच्या अर्जाची किमान मर्यादा रु. १,५०० वरून रु. ३०० वर आणावी. ४. सांप्रत लँड मॉर्गेज बँकांच्या बोर्डाला ४,००० रुपयांपर्यंत कर्जमागणीच्या अर्जाची मंजुरी देण्याचा अधिकार देण्यांत यावा.

### सहकारी संस्थांच्या व्यवस्थेखालीं कापूस व धान्यबाजार

माजी मध्यप्रदेश सरकारनें सन १९४७ सालीं कॉटन मार्केट ॲक्ट दुरुस्त करून चांगल्या तालुका सहकारी शेतकी संस्थांच्या व्यवस्थेखालीं कांहीं कापूस व धान्यबाजाराची व्यवस्था दिली आहे व या तत्त्वाचा भारत सरकारचे प्लॅनिंग कमिशननें पुरस्कार केला आहे. या योजनेखालीं असलेल्या कापूस व धान्य बाजारांची व्यवस्था शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें प्रगतिपर आहे व ही व्यवस्था मुंबई राज्यानें सुरू ठेवावी अशी या परिषदेची कळकळीची विनंति आहे.

### निर्यात कोटे

भारत सरकारनें सहकारी संस्थांना निर्यात कोटे देण्याचा जो स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे, त्याबद्दल ही परिषद् भारत सरकारला धन्यवाद देते. परंतु जाहीर केलेल्या कापसाच्या कोट्यांपैकी सरकारनें आज सहकारी संस्थांना फक्त शेकडा १० चें ठेवलेलें प्रमाण अपुरें असून तें कमींत कमी शे. २५ असावें. तसेंच सहकारी संस्थांना व शेतकऱ्यांना आज हा धंदा नवीनच असल्यानें शेतकऱ्याचाच माल पाठवावा अशी परिस्थिति सध्यांच्या परिस्थितींत करूं नये अशी या परिषदेची मे. रजिस्ट्रारसाहेब, मुंबई प्रांत यांना कळकळीची विनंती आहे.

### शेतकऱ्यांच्या कर्जाची तडजोड

ही परिषद् सरकारास अशी आग्रहाची विनंती करिते कीं, हल्लीं शेतकऱ्यांना सावकाराकडून जें कर्ज देण्यांत येतें त्याबाबत कल्पनातीत व भरमसाठ शर्ती घालण्यांत येत आहेत. जसें, मुद्दल रकमेच्या दुप्पटी–तिप्पटीचे दस्तऐवज खोटें भरणें घालून करून घेणें व खोट्या इस्टेटीच्या इसार चिठ्या करून पूर्ण खरेदीखतें हा प्रकार सर्रास सुरू आहे. त्यामुळें शेतकरीवर्गाची परिस्थिति सुधारणेच्या पलीकडे बिघडली आहे. सहकारी चळवळीमार्फत देण्यांत येणारे कर्जाचा उपरोक्त सावकारांचे आर्थिक परिस्थिति सुधारण्यास न होता तो उपरोक्त सावकारांचे भरमसाठ व खोटे भरण्याचें कर्ज सुरक्षित करण्यासाठी व त्या कर्जफेडीकडे उपयोग होतो. त्या भयानक आपत्तींतून शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी ही परिषद् सरकारास अशी आग्रहाची विनंती करते कीं, (अ) सर्व शेतकऱ्यांचे कर्जाचे कन्शीलिएशन करण्याबद्दलचा कायदा ताबडतोब करून शेतकऱ्यांना आपत्तींतून वांचवावें. (आ) याशिवाय ताबडतोब महाणी बँकेशीं संबंध असलेल्या आसाम्यांचे सावकाराच्या कर्जाचें कन्सीलिएशन करण्याचे अधिकार लँड मॉर्गेज बँकेस देण्यांत यावे.

### सहकारी बँकांकडून अल्प व मध्यम मुदतीचें कर्ज

सहकारी बँकांकडून अल्प व मध्यम मुदतीचें कर्ज शेतकऱ्यांना देण्यांत यावें व सरकारकडून शेतकऱ्यांना तकावी रूपानें दिलें जाणारें कर्ज बंद करण्यांत यावें व सहकारी सेंट्रल बँक ही कर्ज पुरविणारी एकमेव संस्था राहील अशी व्यवस्था करण्यांत यावी आणि सहकारी संस्थेनें दिलेल्या कर्जानंतर कोणत्याहि प्रकारचे सरकारी कर्जाच्या करितां शेतकऱ्यांचे जमिनीवर सरकारचा अग्रतेचा हक्क राहूं नये. ज्यांना आगाऊ कर्ज दिलें त्याचाच अग्रतेचा हक्क असणें न्यायाला धरून आहे. हल्लींचे कायद्यानुसार सहकारी संस्थांनीं दिलेल्या कर्जानंतरहि सरकारी कर्ज दिलें असल्यास सरकारचा अग्रतेचा हक्क राहतो. म्हणून हा अन्याय दूर होण्याकरितां १९१२ चे सहकारी कायद्यांतील कलम १९ मध्यें वरप्रमाणें आवश्यक ती दुरुस्ती करण्यांत यावी अशी सरकारला या परिषदेची आग्रहाची विनंती आहे.

---

### जनता विमापत्रें

दि लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानें २६ मे, १९५७ ते १७ मार्च, १९५८ पर्यंत १,३९,२१,५५१ रुपये मूल्याचीं २४,४११ जनता आयुर्विमापत्रें दिलीं.

---

### हिंदुस्थान सॉल्ट कंपनीची स्थापना

सांभार, दिद्वाना व खाराघोडा येथील सरकारी मालकीचीं मिठागरें ताब्यांत घेण्यासाठी भारत सरकारनें दि हिंदुस्थान सॉल्ट कंपनी ( प्रायव्हेट ) लि. या कॉर्पोरेशनची स्थापना केली आहे. या मिठागरांची सध्यां खात्यांकडून व्यवस्था पाहिली जात असते. या कॉर्पोरेशनची कंपनीज ॲक्टाखालीं नोंदणी करण्यांत आली असून, इतर गोष्टींबरोबरच तें मीठ व मिठाचे उपपदार्थ यांचें उत्पादन, वापर, प्रक्रिया इत्यादि गोष्टींची जबाबदारी घेईल. या कंपनीचें अधिकृत भांडवल १ कोटी रु. असून, तिची कचेरी राजस्थान राज्यांत असेल.

## सहकारी चळवळीबाबत तज्ज्ञाचा गंभीर इशारा

### सर माल्कम डार्लिंग ह्यांचा अहवाल

### (२)

सर माल्कम डार्लिंग यांचें म्हणणें असें कीं, यापुढें कर्ज देण्याचें धोरण जरा बदललें पाहिजे व त्यांतील सैलपणा बंद केला पाहिजे. नाहींतर, थकबाकींत जी वाढ होत आहे ती अशीच होत राहील. सहकारी पद्धतीची वाढ करण्याचें ठरविलें असतां आज निरनिराळ्या राज्यांत जी कमी-जास्त वाढ झाली आहे किंवा कांहीं राज्यांत सहकारी संस्था अगदींच कमजोर आहेत त्याचा स्वतंत्रपणें विचार करणें जरूर आहे. त्याकडे नियोजन करणाऱ्यांचें दुर्लक्ष झालेलें आढळतें. म्हणून सर माल्कम असें सुचवितात कीं, प्रत्येक राज्यांतील परिस्थिति ध्यानांत घेऊन त्याच्या प्रगतीच्या मर्यादा नक्की कराव्यात व त्याकरितां जरूर पडल्यास कालावधि पण वाढवून घ्यावा.

सहकारी संस्थांच्या वाढीच्या उद्दिष्टांकडे इतक्या वेगानें धांव घेतली जात आहे कीं त्यामुळें सहकारी संस्थांचा व्याप वाढवीत असतांना त्यांच्या व्यवस्थितपणाकडे कोणी पाहूंच शकत नाहीं.

सहकारी संस्थांच्या योजनेच्या प्रगतीकरतां भारतांतील तज्ज्ञांनीं असें सुचविलें आहे कीं, या संस्थाचें स्वरूप अधिक मोठें करणें इष्ट आहे. यासंबंधीं सर माल्कम यांचे विचार निराळे आहेत. ते म्हणतात कीं, अशा रीतीनें सहकारी संस्था आकारांनीं मोठ्या करत नेण्यानें सहकारी संस्थांसंबंधीं आपली जी मूळ भूमिका होती ती संपूर्णपणें बदलते. या संस्थांचें जें वैशिष्ट्य कीं सभासदांचा निकटचा संबंध व एकजिनसीपणा, तोच यामुळें नाहींसा होतो.

बचत व पत या क्षेत्रांपुरत्याच सहकारी संस्था मर्यादित न ठेवतां त्या ग्रामीण जीवनांतील सर्व क्षेत्रांत प्रसृत व्हाव्या हा विचारहि सर माल्कम यांना पसंत नाहीं. सहकारी संस्थांच्या संघटनांची खरी शक्ति बचतीच्या व कर्जनिवारणाच्या सहकारी संस्थांवर प्रामुख्यानें अवलंबून आहे, आणि त्यांच्या पहाणीप्रमाणें गेल्या पांच वर्षांत भारतांतील ग्रामीण विभागांत उत्पन्नाचे बाबतींत वाढ होऊनहि पतपेढ्यांच्या व कर्जनिवारणार्थ निघालेल्या सहकारी संस्थांच्या ठेवींमध्यें समाधानकारक वाढ नाहीं. दीर्घकालाचा विचार करतां ही गोष्ट अनिष्ट आहे.

सहकारी संस्थांच्या दैनंदिन कार्यांत सरकारचा वाढता हस्तक्षेप चालू आहे हें देखील बरें नव्हे. त्यामुळें सहकारी संस्थांचें स्वातंत्र्य नष्ट होत जाईल. आज सहकारी संस्थांची परिस्थिति चमत्कारिक होत चालली आहे. त्यांचें अस्तित्व नाममात्र असून निव्वळ मध्यवर्ती बँकेच्या प्रतिनिधी म्हणूनच त्या काम करीत आहेत. ही परिस्थिति अर्थातच हितावह नाहीं.

आपल्या अहवालाच्या शेवटीं सर माल्कम ह्यांनीं या संस्थांच्या कामाकरितां चांगल्या नोकरवर्गाची गरज फारच आहे असें स्पष्ट सांगितलें आहे. रजिस्ट्रारसारख्या अगदीं वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यापासून तें थेट सर्वसामान्य नोकरापर्यंत सर्वांना निश्चित स्वरूपाचें शिक्षण दिलें पाहिजे. त्याशिक्षणामध्यें तात्त्विक अभ्यासापेक्षा व्यावहारिक अभ्यासावर अधिक भर दिला पाहिजे.

ग्रामीण विभागाच्या विकासकार्यांची पहाणी करितांना सर माल्कम ह्यांनीं जेथें जेथें भेटी दिल्या तेथें तेथें प्रत्यक्ष कामाचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची त्यांना फारच उणीव दिसली आणि म्हणूनच नोकरवर्गाच्या ट्रेनिंगसंबंधीं त्यांनीं अनेक सूचना केल्या आहेत.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.**

शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९२,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८१७ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.